

❖ प्रस्तावना –


मुलांनो, आपल्याला प्राचीन व मध्ययुगीन संस्कृती समजून घेण्यासाठी त्या अगोदरचा कालखंड समजून घेणे आवश्यक आहे. माणूस पृथ्वीवर सर्वप्रथम वावरु लागला त्याला हजारो वर्षे झाली. हा कालखंड समजण्यासाठी आपण ऐतिहासिक काळ आणि इतिहासपूर्व काळ अशी विभागणी केली.


जगाचा इतिहास
प्रागैतिहासिक काळ
इतिहासपूर्व काळ
ऐतिहासिक काळ
पुराश्मयुग
मध्याश्मयुग
नवाश्मयुग
ताम्रपाषाणयुग
प्राचीन काळ
मध्ययुगीन काळ
आधुनिक काळ

## ❖ चार्लस डार्विन –



- चार्लस डार्विनने सजीवांच्या उत्क्रांतीचा सिध्दांत माडला.
- सुमारे २० लाख वर्षापूर्वी आदिमानव अस्तित्वात होता असे डार्विनने सांगितले.
- आदिमानव गुहांमध्ये राहत होता.




मानवात झालेली प्रगती

# प्रागैतिहासिक काळ

## पुराश्मयुग

- दगडी हत्यारांचा वापर करत
- हातकुऱ्हाड हे मानवाने बनविलेले पहिले हत्यार
- कंदमुळे काढणे व मांसाचे तुकडे करण्यासाठी

## मध्याश्मयुग

- मानव समूहाने राहू लागला.
- कुटुंबसंस्थेची निर्मिती
- चित्रकलेचा विकस
- गुहाचित्रांची निर्मिती.

उदा – भीमबेटका (मध्यप्रदेश)


## नवाश्मयुग


- मानव पशुपालन करु लागला.
- चाकाचा शोध
- सुबक हत्यारे
- कृषी व व्यवसाय यातील विकासाने व्यापारात वाढ
- मानवी जीवन समृध्द

## ताम्रपाषाणयुग

- सुमारे १० हजार वर्षापूर्वी मानवाला धातूचा शोध
- ताम्रपाषाण युगात ताम्र, कास्य व लोह या धातूचा वापर वाढला


# भीमबेटका येथील गुहाचित्रे





# ❖ प्रागैतिहासिक कलेचे काही नमुने -

T1_L2_A1_F1




T1_L2_A1_F1

१) सांबरशिंगावर कोरलेले रेनडिअर, जर्मनी
२) बैल व घोडे यांचे चित्रण, लॅस्को गुहा, फ्रान्स
३) काळवीट आणि मासे यांचे चित्रण, लोर्थे फ्रान्स
४) मग्डेलिअन संस्कृतीतील गव्याचे शिल्प, ला मादेलीन गुहा, फ्रान्स
५) रानगव्याचे मृत्तिकाशिल्प (लांबी ६१ सेंमी.), तू द ऑदुबर्त, फ्रान्स
६) घोडेस्वाराचे चित्रण, भीमबेटका, भारत.

या वरुन आपल्याला प्रागैतिहासिक काळातील कलेची माहिती समजण्यास मदत होते.

T1_L2_A1_F2

# मानवाला लागलेला चाकाचा शोध



T1_L2_A1_F2

## ❖ भारतातील नवाश्मयुगीन स्थाने –

- भारतातील नवाश्मयुगाचा कालखंड साधारणत: इ.स.पूर्व ४५०० ते इ.स.पूर्व २००० पर्यंतचा मानला जातो.
- काश्मीरमधील झेलमचे खोरे, ओरिसा, उत्तर प्रदेशातील हमीदपूर, अलाहाबाद, बांदा जिल्हा, मध्य प्रदेशातील छत्रपूर, पन्ना विभाग, बिहारमध्ये हजारीबाग, पाटणा, रांची, पश्चिम बंगालमध्ये दार्जिलिंग, नादिया, आसाममध्ये गारो, नागा टेकड्यांचा प्रदेश येथील उत्खननात नवाश्मयुगीन अवशेष सापडले आहे.

- बेल्लारी जिल्हा व म्हैसूर, हैद्राबादजवळील प्रदेश हा नवाश्मयुगीन संस्कृतीचा केंद्रबिंदू मानला जातो.
- झेलमच्या खोऱ्यातील श्रीनगरजवळील बुर्झोम येथील उत्खननात नवाश्मयुगीन मानवाच्या वस्तीबाबत तपशिलवार माहिती मिळते.
- दक्षिण भारतातील कर्नाटकात उटनूर, पिकलीहाळ, टेक्कलकोटा, पयमपल्ली व आंध्रात ब्रह्मगिरी, नागार्जुन कोंडा येथील उत्खननात नवाश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत.
- धातूचा शोध व त्यांची अवजारे यातून ताम्रपाषाण युग अवतरले आणि मानवी जिवन गतिमान झाले.